**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६**

फोन नं. ०२०/२६०५१५१२ Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. विधी-३७२४/प्र.क्र. ७३ (ई-८६०७८२) /सीईटीसेल/ दिनांक : ०८/१०/२०२४

**परिपत्रक -**

वाचा : सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८

**विषय : केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रमाणित करणेबाबत . . .**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, सद्यस्थितीत केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बी.ए./बी.एस्सी.बी.एड., विधी ३ वर्ष, विधी ५ वर्ष, बी.पी.एड., बी.एड.-एम.एड., एम.एड. आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संपलेली असून बी.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मधील कलम ९ (५) च्या तरतुदीनुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत करण्यात आलेले प्रवेश संचालनालयाद्वारे प्रमाणित करुन त्यास प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार प्रवेश मान्यतेची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे -

*(एक) प्रत्येक विनाअनुदानित संस्था प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, संबंधित संचालनालयाला प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव सादर करील,*

*(दोन) प्रत्येक संस्था संबंधीत संचालनालयाने प्रमाणित केलेले असे प्रस्ताव, अशा प्रमाणनाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालमर्यादेच्या आत प्रवेश नियामक प्राधिकरणाला सादर करील,*

*(तीन) प्रवेश नियामक प्राधिकरण, संस्थांकडून मिळालेल्या अशा प्रस्तावांची प्रत्येक वर्षाच्या ३० जानेवारीपूर्वी छाननी करील आणि त्यांना मान्यता देईल.*

उपरोक्त तरतुदीनूसार व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची संपूर्ण माहितीसह प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर १५ दिवसाच्या आत संचालनालयाकडे "प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव" सादर करणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संचालनालय स्तरावरुन प्रवेश प्रमाणित करणेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार असून त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

i. सर्व महाविद्यालयांनी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर अपलोड करावेत.

ii. महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर सर्व कागदपत्रे अपलोड करुन, प्रवेश प्रमाणित करणेबाबतचा प्रस्ताव संचालनालयास सोबतच्या तक्त्यातील स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या अंतिम दिनांकापर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

iii. संचालनालयास प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने पोर्टलवर अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे सोबतच्या तक्त्यातील स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविलेल्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रमाणित करण्यात येणार आहेत.

**iv. सदरहू पडताळणीमध्ये प्रवेशाबाबत त्रूटी आढळून आल्यास त्याबाबतचा तपशील / त्रूटी महाविद्यालयाचे लॉगीनमध्ये दर्शविण्यात येईल. सदरहू प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने त्रूटींबाबत कोणत्याही प्रकारे ईमेलद्वारे अथवा पत्राद्वारे कळविण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

v. महाविद्यालयाने प्रवेश प्रमाणित करण्याच्या कालावधीदरम्यान आपले लॉगिन दररोज तपासावे, जर विद्यार्थ्याचे प्रवेशाबाबत त्रूटी दर्शविण्यात आली असल्यास त्याचे पूर्ततेसाठी आवश्यक कागदपत्र तातडीने अपलोड करावीत.

**vi. सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संचालनालय स्तरावर प्रवेश प्रमाणित करणेबाबतच्या अंतिम दिनांकापर्यंत त्रूटी पूर्ततेसाठी आवश्यक कागदपत्र पोर्टलवर सादर न केल्यास, संबंधित प्रवेश त्रूटीमध्ये दर्शविण्यात येईल. तद्नंतर सदरहू त्रूटी प्राधिकरणाचे पूर्वमान्यतेशिवाय संचालनालय स्तरावरुन प्रमाणित करण्यात येणार नाही.**

vii. महाविद्यालयाचे प्राचार्यांनी उक्त दिलेल्या सूचना व सोबत जोडलेल्या वेळापत्रकानूसार विहित कालमर्यादेत कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्र सादर न केल्यामुळे विद्यार्थ्याचे प्रवेशाला मान्यता न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 10-10-2024 15:44:58

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति -

प्राचार्य, केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी सर्व महाविद्यालये.

प्रत माहितीकरिता अग्रेषित -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, फोर्ट, मुंबई - ०१.

# केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५ प्रवेश मान्यता वेळापत्रक

| अ. क्र. | अभ्यासक्रम | Cut Off Date | महाविद्यालयाने पोर्टलवर कागदपत्र अपलोड करणे व संचालनालयास प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक | संचालनालयाद्वारे प्रवेश प्रमाणित करणेबाबतचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बी.ए./बी.एस्सी. बी.एड. | ०६/०९/२०२४ | २६/०९/२०२४ | १४/१०/२०२४ ते ३१/१०/२०२४ |
| २ | बी.एड.-एम.एड. | ३१/०८/२०२४ | १९/०९/२०२४ | |
| ३ | विधी ५ वर्ष | १२/०९/२०२४ | ३०/०९/२०२४ | १४/१०/२०२४ ते २९/११/२०२४ |
| ४ | एम.एड. | ०१/१०/२०२४ | १६/१०/२०२४ | १७/१०/२०२४ ते २९/११/२०२४ |
| ५ | एम.पी.एड. | ०१/१०/२०२४ | १६/१०/२०२४ | |
| ६ | बी.पी.एड. | ०१/१०/२०२४ | १६/१०/२०२४ | |
| ७ | विधी ३ वर्ष | ०१/१०/२०२४ | १६/१०/२०२४ | १७/१०/२०२४ ते १६/१२/२०२४ |
| ८ | बी.एड. | १०/१०/२०२४ | २८/१०/२०२४ | २९/१०/२०२४ ते ३१/१२/२०२४ |

* * *